कर्मयोग (कर्माच्या माध्यमातून ईश्वरप्राप्ती) : खंड १

# कर्मयोगाचे प्रास्ताविक

मराठी (Marathi)


**संकलक**

**हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्‌घोष करणारे**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**आणि पू. संदीप गजानन आळशी**



**सनातन संस्था**



**卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐**

मराठी ३४५, इंग्रजी २०१, कन्नड १९९, हिंदी १९७, गुजराती ७०, तेलुगु ५४, तमिळ ४४, बंगाली ३०, मल्ल्याळम् २४, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**जानेवारी २०२५ पर्यंत ३६६ ग्रंथांच्या १३ भाषांत ९८ लाख ६६ सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना (२२ मार्च १९९९)

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून ३.२.२०२५ पर्यंत १३० साधक संत झाले, तर १,०४९ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल

३. देवता, साधना, राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती (वर्ष १९९५ पासून आरंभ)

४. हिंदुत्वनिष्ठ नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक (२८ एप्रिल १९९८ ते १९ एप्रिल २००० पर्यंत)

५. धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्वनिष्ठ आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन !

७. भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रसारार्थ ‘भारत गौरव पुरस्कार’ देऊन फ्रान्सच्या संसदेत सन्मान (५ जून २०२४)

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी !

सद्गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ आणि सद्गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ या सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत. जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति’ आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति’ या उपाधीने संबोधले जात आहे. F (DrUtt + SStAG-Nav + SStBS-Nav)

## पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक 'सनातन प्रभात'मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

---

## अनुक्रमणिका

**(प्रकरणांतील वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)**


卐 **मनोगत** ७

१. **कर्मयोगाच्या व्याख्या** ९

२. **कर्मयोगाचे समानार्थी शब्द :** नारायणीय धर्म अन् कर्मसंन्यासमार्ग ९

३. **कर्म आणि कर्मयोग** १०

३ आ. निष्काम भाव नसेल, तर तो कर्मयोग नसून नुसते कर्म असणे ११

३ इ. कर्मयोगातील कर्म हे कोणतेही कर्म नव्हे, तर वेदविहित कर्म ११

३ ई. अशास्त्रीय कर्मे कुशलतेने करण्याकरिता कर्मयोग नसणे ११

४. **कर्मयोगाचा इतिहास** १२

५. **कर्मयोगाचे महत्त्व** २१

५ अ. कर्मयोगानुसार कर्माचे महत्त्व २१

५ आ. व्यष्टी साधनेच्या संदर्भात कर्मयोगाचे महत्त्व २४

५ आ ३. कर्म कुशलतेने करणे, हा योग २४

५ आ ५. वासनांचा त्याग करण्यासाठी कर्मयोग आचरणे आवश्यक २५

| | | |
|---|---|---|
| ५ आ ९. | कर्मयोगाने सगळ्या दुःखांपासून मुक्ती मिळणे | २८ |
| ५ इ. | समष्टी साधनेच्या संदर्भात कर्मयोगाचे महत्त्व | २८ |
| **६.** | **कर्मयोगाची वैशिष्ट्ये** | **३०** |
| ६ अ. | कर्माची गती (व्याप्ती) गहन असणे | ३० |
| ६ उ. | कर्मांचा त्याग करून कर्मत्याग साधू न शकणे | ३१ |
| **७.** | **कर्मयोगाचे रहस्य म्हणजे कर्तेपणाचा त्याग** | **३३** |
| ७ अ. | कर्त्याचे प्रकार, कर्त्याला कर्मानुसार मिळणारे फळ इत्यादी | ३३ |
| ७ आ. | कर्म, ज्ञान आणि भक्ती या योगांनुसार कर्तेपणाचा त्याग | ४० |
| **८.** | **कर्मयोगाचे अनधिकारी** | **४९** |
| ८ इ. | देव न मानणारा देवमाणूस (सज्जन) म्हणजे तथाकथित कर्मयोगी | ४९ |
| ८ उ. | धार्मिक कार्यावर विश्वास नसलेले संत सामाजिक कार्याला लागणे | ५० |
| **९.** | **कर्मयोगानुसार करावयाच्या कर्माचे (साधनेचे) सार** | **५१** |
| ९ अ. | कर्मबंधनात न अडकता कर्मे कशी करावीत ? | ५१ |
| ९ इ. | कर्मबंधनात अडकण्याचे कारण : पाच क्लेश | ५५ |
| ९ उ. | कर्मबंधनातून मुक्त झाल्याने भगवंताला पावणे ! | ५६ |
| **१०.** | **अनुभूती** | **५७** |
| **卐** | **काही आनुषंगिक सूत्रे** | **५९** |
| **卐** | **प्रस्तुत ग्रंथाचे अध्यात्मशास्त्रीय परिभाषेतील सार !** | **६२** |
| **卐** | **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** | **६७** |


---

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

## मनोगत

'कर्मयोग' म्हटले की, काही जणांना भिकाऱ्यांसाठी दानकर्म करणारे, शाळा-महाविद्यालये काढणारे आणि सामाजिक कार्य करणारे 'कर्मयोगी' आठवतात. अशांचे कार्य हे बहुतांश वेळा भावनेपोटी वा प्रसिद्धीसाठी होत असल्याने हा कर्मयोग नव्हे. कर्मयोग म्हणजे नेमके काय ? जे कर्म केल्याने आपली आध्यात्मिक उन्नती होऊन आपल्याला ईश्वरप्राप्ती होते, असे कर्म करत रहाणे म्हणजे 'कर्मयोग'. कर्म, मग ते व्यवहारातील का असेना, त्या योगे चित्तावर संस्कार होऊ न देता संस्कारबंधनातून कायमची सुटका करून घेणे, हे कर्मयोगात अभिप्रेत आहे. हिंदु धर्माला आणि धर्मशास्त्राला अपेक्षित असे कर्म आसक्ती आणि फलाशा त्यागून करणे, ही कर्मयोगाची श्रेष्ठ व्याख्या होय. भक्तीयोगी, ध्यानयोगी वगैरेंनीही त्यांच्या साधनेला कर्मयोगाची जोड दिली, तर त्यांची साधना अधिक चांगली होण्यास निश्चितच मदत होते.

'कर्मयोग' या विषयाची व्याप्ती मोठी असल्याने त्याच्याशी संबंधित विविध पैलू आम्ही 'कर्मयोग' या ग्रंथमालिकेतील विविध ग्रंथांतून स्पष्ट केले आहेत. प्रस्तूत ग्रंथ हा कर्मयोगाविषयी मूलभूत माहिती देणारा आणि या मार्गाने करावयाच्या साधनेचे सार स्पष्ट करणारा ग्रंथ आहे. कर्मयोगाचा इतिहास; अर्जुनाच्या कर्मयोगासंबंधीच्या शंका आणि श्रीकृष्णाने केलेले शंकानिरसन; कर्म करण्याचे महत्त्व; व्यष्टी आणि समष्टी साधनेच्या संदर्भात कर्मयोगाचे महत्त्व; कर्मयोगाची वैशिष्ट्ये; कर्मयोगाचे रहस्य म्हणजे कर्तेपणाचा त्याग आणि कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तीयोग या मार्गांनुसार तो कसा करावा; स्वधर्मकर्म आणि कर्तव्यकर्म का आणि कसे करावे इत्यादींचा ऊहापोह हा ग्रंथ करतो.

महान योगतपस्वी गुरुदेव डॉ. काटेस्वामीजी यांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील बऱ्याच श्लोकांचा मतीतार्थ आम्हाला सांगितल्याने कर्मयोगासारखा कळायला कठीण विषय या ग्रंथात सोपा करता आला आहे. याबद्दल आम्ही गुरुदेवांच्या चरणी कितीही कृतज्ञता व्यक्त केली, तरी ती अपुरीच पडेल.

प्रत्यक्ष दैनंदिन जीवनाशी जास्त निगडित असलेल्या कर्मयोगाचे आचरण करून आध्यात्मिक उन्नती करण्याची इच्छा साधकांच्या मनात निर्माण होवो, अशी श्रीगुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**

## मुखपृष्ठ संकल्पना

मुखपृष्ठावर सुख-दुःखाचे प्रसंग दाखवितांना ते चौकटीत (म्हणजे बंधनयुक्त) दाखविले आहेत, तर ईश्वरचिंतन करत कर्तव्यभावाने केलेले कर्म मोकळे (म्हणजे बंधनमुक्त) दाखवले आहे. मायेतून अन् अपेक्षेतून निर्माण झालेली नाती बंधनात अडकवतात, तर कर्तव्यभावाने केलेले निरपेक्ष कर्म हे जिवाला कोणत्याही बंधनात न अडकवता ईश्वरशी एकरूप होण्यास साहाय्यक ठरते.

### परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाध्यांविषयीचे विवेचन !

थोर महर्षींनी सहस्रो वर्षांपूर्वी नाडीपट्ट्यांमध्ये भविष्य लिहून ठेवले आहे. या जीवनाडीपट्ट्यांच्या वाचनाच्या माध्यमातून महर्षी सनातन संस्थेला मार्गदर्शन करतात. १३.७.२०२२ पासून 'सप्तर्षी जीवनाडीपट्टी'च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना 'सच्चिदानंद परब्रह्म' ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले, तरी त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधक लिहून देत असलेल्या लिखाणात त्यांनी 'प.पू.' किंवा 'परात्पर गुरु' अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे. F (DrV-Nav)

**धर्माविषयीचे अपसमज दूर करणारा सनातनचा ग्रंथ !**

**धर्माचे मूलभूत विवेचन**

- हिंदु धर्माचे महत्त्व आणि त्याचे सिद्धान्त कोणते ?
- हिंदु धर्माची निर्मिती केव्हा झाली ?